सन २०१५ मध्ये केरळ येथे पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : पुरवणी ३२१७ /प्र.क्र.१४१/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २७ मार्च, २०१८.

वाचा:

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : क्रीडायो २०१२ /प्र.क्र १५८/१२/क्रीयुसे - २; दि.०५.०२.२०१४.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो १२१६/प्र.क्र ५४/१२/क्रीयुसे -२; दि.०८.०१.२०१८.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : पुनर्वि २८१७/(५३/१७)/अर्थसंकल्प; दि.२७.०३.२०१८.

प्रस्तावना –

संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये ऑलिंपिक,राष्ट्रकूल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिके देवून गौरविण्याची योजना कार्यन्वित आहे. सदर योजनेमध्ये संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूंना रोख पारितोषिक देण्याच्या योजनेचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१५ मध्ये केरळ येथे पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शक यांनी राष्ट्रीय स्तरावर गौरवास्पद कामगिरी करुन राज्याचे नाव उज्ज्वल केले आहे. सदर खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक यांना रोख पारितोषिक देऊन गौरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१५ मध्ये केरळ येथे पार पडलेल्या ३५ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ३१९ पदक प्राप्त खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक यांना संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केल्यानुसार रोख पारितोषिके अदा करण्यासाठी तसेच सदर पारितोषिक वितरण समारंभाच्या आयोजनासाठी रु.९८६.०० लक्ष इतकी तरतूद शासन उपलब्ध करुन देत आहे. हा खर्च भागविण्यासाठी तसेच एशियन कबड्डी चॅम्पियनशीप स्पर्धेतील भारतीय महिला संघातील महाराष्ट्र राज्यातील श्रीम. सायली जाधव व श्रीम. अभिलाषा म्हात्रे या खेळाडूंना गौरविण्यासाठी राज्य क्रीडा विकास निधीतून घेतलेल्या रु. १४.०० लक्ष इतकी प्रतीपूर्ती राज्य क्रीडा विकास निधीस करण्यासाठी एकूण रु. १०००.०० लक्ष (रुपये दहा कोटी फक्त) इतकी रक्कम आयुक्त, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. जर सांघिक खेळ प्रकारात एकापेक्षा जास्त खेळाडूंकरिता एकच मार्गदर्शक असेल तर एका खेळाडूच्या मार्गदर्शकासाठी अनुज्ञेय असलेली रोख पारितोषिकाची रक्कम त्या मार्गदर्शकास देय राहील.

३.	उपरोक्त बाबीकरीता होणारा खर्च "मागणी क्रमांक ई-३,२२०४- क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (०९) खेळाडूंना शिष्यवृत्त्या व पुरस्कार (०९)(०६) ऑलिम्पिक, राष्ट्रकुल व आशियाई स्पर्धांमधील पदक विजेत्यांना रोख पारितोषिक देणे (२२०४ ५३२१)-५० इतर खर्च” या लेखाशीर्षाखालील संदर्भ क्र. ०३ येथील शासन निर्णयान्वये पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

४.	वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०६.०२.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनानूसार उपरोक्त तरतूद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५.	सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र २५८/१८/व्यय-५; दि.०१.०३.२०१८ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१९५४५०६८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.28 14:04:12 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव.
३) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक.
४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७) महालेखापाल (लेखा व परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८) वित्त विभाग (व्यय-५), मंत्रालय, मुंबई.
९) सर्व उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा (संचालनालयामार्फत)
१०) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयामार्फत)
११) लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे (संचालनालयामार्फत)
१२) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (संचालनालयामार्फत)
१३) निवडनस्ती, क्रीयुसे-२.